आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र. ११६ लगत जोड

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १२ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – दिपक सावकार ढवन

वय –३७ वर्षे, व्यवसाय – नोकरी

राहणार–निघोज, ता.पारनेर

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.आर.एस.पटेकर यांचेमार्फत</u>**–

मला पोलीसांनी आरोपी व इतरांचे हस्ताक्षर नमुने घेण्याकरीता पोलीस स्टेशनला बोलावले होते. मला किती तारखेला व किती वाजता बोलावले हे आठवत नाही. माझ्यासोबत शाखाधिकारी आनंद रंगारी आणि सुमीत बोराडे हजर होते. पोलीसांनी तेथे काय केले हे आठवत नाही. माझ्यासमोर हस्ताक्षर नमुने पेपरवर घेतले होते. पोलीसांनी माझ्यासमक्ष अजुन काय केले व काय जप्त केले हे मला आठवत नाही. माझ्यासमक्ष साधारण किती पंचनामे केले व किती तारखेला केले हे मला आठवत नाही.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता तशी ती त्यांना देण्यात आली. सबब उलटतपास सुरु.**

हे मला आठवत नाही की दि.२.१२.२०२२ रोजी मला पोलीसांनी पंचनाम्यासाठी बोलवले होते. मी सांगतो की तारीख आठवत नाही पण पोलीसांनी मला बोलवले होते. हे म्हणणे खरे आहे की त्यादिवशी पंचनाम्यासाठी आरोपी वडझीरे येथील सेंट्रल बँक ऑफ इंडीया येथे हजर होता. मी सांगतो की पंचनाम्यासाठी पोलीसांनी पारनेर पोलीस स्टेशनला बोलवले होते. आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवण्यात आलेल्या गुलाबी रंगाची मुळ विथड्रॉवल स्लीप ज्याला N1 म्हणुन मार्क केले आहे ती दाखवण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की ती आमच्या बँकेची पावती आहे. हे म्हणणे खरे आहे की दि.९.३.२०१८ रोजीची ती पावती ज्यावर खाते क्र.३३६८२८४५७३ व रक्कम रु.१३,०००/– असा उल्लेख आहे व ज्यावर खातेदाराची व अधिका–याची सही आहे ती पावती माझ्यासमक्ष जप्त केली होती. हे म्हणणे खरे आहे की त्यावर गौतम जाधव असे नाव

लिहीलेले आहे. ती पावती ब्रँच मॅनेजर यांनी दिली होती. सदर पावतीस **नि.११७** देण्यात येते. (आरोपीतर्फे वकीलांनी आक्षेप घेतला की सदर पावती केवळ सदर साक्षीदाराच्यासमक्ष जप्त केली असुन त्याच्यावर कुणाचे हस्ताक्षर आहे, सही आहे व नाव आहे याबाबत साक्षीदारास माहीती नाही). आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवण्यात आलेल्या गुलाबी रंगाचा सेंट्रल बँक ऑफ इंडीयाचा दि.३०.११.२०१७ रोजीचा चेक दाखवण्यात आला. त्या चेकवरील खाते क्रमांक आमच्या वडझीरे शाखेचा आहे. त्या चेकचा क्रमांक ०१२०३२ असा असुन तो चेक रक्कम रु.१,५०,०००/– चा व तो चेक गौतम वसंत जाधव यांनी सेल्फ केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की ज्याचे चेकवर नाव आहे त्याची त्यावर सही आहे. हे म्हणणे खरे आहे की सेल्फ विथड्रॉ करण्यासाठी आम्ही दोन सहया घेतो. एक सही चेकच्या पुढील बाजुस व  एक सही चेकच्या मागील बाजुस घेतो. हे म्हणणे खरे आहे की पैसे विथड्रॉ केल्यानंतर आम्ही चेकवर रेफरन्स नंबर व बँकेचा पेमेंटचा स्टॅम्प व पाठीमागुन कॅश मिळाली म्हणुन काउंटर सही घेत असतो.

सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती

(एन.एस.सबनीस)

दिनांकः १८/०८/२०२५.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२,

पारनेर.

आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र. ११६ लगत जोड

**उलटतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री.आर.एस.पटेकर यांचेमार्फत**–

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवण्यात आलेल्या N4 म्हणुन मार्क केलेले अकाउंट ओपनींगचा दि.२१.८.२०१४ रोजीचा फॉर्म दाख्वण्यात आला. तो फॉर्म खाते क्र.३३६८२८४५७३ चा असुन तो फॉर्म गौतम जाधव यांचा आहे व त्यावर वारस म्हणुन रुपाली गौतम जाधवचे नाव लिहीले आहे. तो फॉर्म करंट खात्याचा असुन व सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शाखा वडझीरेचा असुन त्याचे खाते १६.१२.२०१३ पासुन चालु आहे. हे म्हणणे खरे आहे की सदरचा फॉर्मजो भरत असतो त्याची त्यावर सही असते व त्याचे बँकेत खातेदेखील असते व तो फॉर्म भरुन झाल्यावर बँक अधिकारी किंवा मॅनेजर त्या फॉर्मवर त्यांची सही करतात. हे म्हणणे खरे आहे की सदर फॉर्म पोलीसांनी माझ्यासमक्ष जप्त केला होता. सदर फॉर्मला **ओळखीसाठी नि.११८** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवण्यात आलेले N3 म्हणुन मार्क केलेले स्पेसीमन सिगनेचर कार्ड दाखवण्यात आले. त्यावर गौतम वसंत जाधव यांचे नाव, त्यांचा फोटो, पत्ता, मोबाईल नंबर, सही व खाते क्रमांक ३३६८२८४५७३ नमुद असुन सदरचे कार्ड कस्टमर भरत असतो व ते आम्ही विथड्रॉवल किंवा चेक पासींग होण्यासाठी व्हेरीफाय करण्यासंदर्भात घेत असतो. सदर स्पेसीमन सिगनेचर कार्डला **ओळखीसाठी नि.११९** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवण्यात आलेले N5 म्हणुन मार्क केलेले ग्राहकाचा माहीती फॉर्म दाखवण्यात आला. तो अकाउंट ओपनींग फॉर्मसोबत जोडलेला असतो. त्याचा सीआयएफ नं.८१५५४२८९२९ असा आहे. तो गौतम वसंत जाधव यांच्यानावाने आहे व त्यावर गौतम जाधव यांची सही घेतल्यानंतर संबंधीत अधिका–याची फॉर्मवर सही आहे. त्या फॉर्मसोबत ओळख म्हणुन आम्ही आधार कार्ड घेत असतो व त्या फॉर्मसोबत ओळख म्हणुन N6 म्हणुन मार्क केलेले गौतम जाधवचे आधारकार्ड जोडले आहे व त्यावर त्याची सही आहे. सदर ग्राहकाच्या माहीती फॉर्मला **ओळखीसाठी नि.१२० व आधारकार्डच्या प्रतीस ओळखीसाठी नि.१२१** देण्यात येते.(आरोपीतर्फे वकीलांनी आक्षेप घेतला की ग्राहक

माहीती फॉर्मवरील ओळख म्हणुन आरोपीची घेतलेल्या सहीबाबत प्रश्न या साक्षीदारास विचारता येणार नाही). हे म्हणणे खरे आहे की आनंद रविशंकर रंगारी, शाखा व्यवस्थापक, शाखा वडझीरे यांनी N1 ते N6 वरील मार्क केलेले सर्व कागदपत्रे माझ्यासमक्ष पोलीसांना दिले होते व ते कागदपत्र जमा करताना माझ्यासोबत दुसरे पंच समीत दामोदर बोराडे हजर होते. हे म्हणणे खरे आहे की दि.२.१२.२०२२ रोजी पोलीसांनी या सर्व कागदपत्रांबाबत माझ्यासमक्ष सायंकाळी ४.३० ते ५.२० पर्यंत पंचनामा केला व त्या पंचनाम्यावर माझी, समीत बोराडे व शाखाधीकारी रंगारी यांच्या सहया घेतल्या. आता मला तो पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी अ.क्र.१ वर सही आहे व त्यातील मजकुर माझ्यासमक्ष पोलीसांनी टाईप केला होता. सदर पंचनाम्यास **नि.१२२** देण्यात येते.

हे म्हणणे खरे आहे की दि.१.१२.२०२२ रोजी पोलीसांनी शाखाधीकारी रंगारी यांच्याकडुन काही कागदपत्र जप्त केले होते. आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवण्यात आलेले N7 म्हणुन मार्क केलेली गूलाबी रंगाची वीथड्रॉवल स्लीप दाखवण्यात आली. त्यावर दि.२.७.२०१९ तारीख नमुद असुन ती स्लीपवर रक्कम रु.१८०० नमुद असुन त्या स्लीपवर पी.बी.बोरुडे यांचे नाव आहे व त्यावर खाते क्र.२१३२१६५४८१ नमुद आहे व त्यावर N7 ला सही आहे. हे म्हणणे खरे आहे की ती पावती स्वतः कस्टमर भरुन देतात व त्यावर बँकेचे कर्मचारी सही करतात. हे म्हणणे खरे आहे की ती पावती माझ्यासमक्ष रंगारी यांनी पोलीसांना दिली होती व पोलीसांनी ती जप्त केली होती. त्यास **ओळखीसाठी नि.१२३** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवण्यात आलेला चेक क्र.०११०६० ज्यावर N8 म्हणुन मार्कींग आहे तो चेक दाखवण्यात आला. त्यावर दि.७.५.२०१९ तारीख व रक्कम रु.३,६००/– व नाव सेल्फ प्रकाश बळवंत बोरुडे आणि खाते क्र.२३३३१९९०३६ असे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की तो चेक पोलीसांनी माझ्यासमक्ष व दुसरे पंच यांच्यासमक्ष जप्त केला होता. त्यास **ओळखीसाठी नि.१२४** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवण्यात आलेले N9 म्हणुन मार्कींग असलेलेसेंट्रल बँक ऑफ इंडीया, वडझीरे यांनी पारनेर शाखेला पाठवलेले पत्र दाखवण्यात आले. ते पत्र माझ्या समक्ष रंगारी साहेबांनी पोलीसांना काढुन दिले होते

व पोलीसांनी ते जप्त केले होते. त्यास **ओळखीसाठी नि.१२५** देण्यात येते. आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवलेले N10 व N23 मार्कींग असलेले गुलाबी व पिवळया रंगाची सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे येथील फिक्स्ड डिपॉझीट रिसीट दाखवण्यात आली. तिचा नंबर ०८६७९९ व खाते क्र.३७८७९६६४८७ असा नमुद असुन ती दि.२९.११.२०१९ रोजीची असुन त्यावर रामचंद्र बबन करकंडे यांचे नाव असुन ती पावती रु.१,५०,०००/– बाबत असल्याचे नमुद आहे. सदर फिक्स्ड डिपॉझीट रिसीटला **ओळखीसाठी नि.१२६** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवलेले N11 व N24 मार्कींग असलेले गुलाबी व पिवळया रंगाची सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे येथील फिक्स्ड डिपॉझीट रिसीट दाखवण्यात आली. तिचा नंबर N ०८६७७१ व खाते क्र.३७८०३३५८३३ असा नमुद असुन ती दि.१६.१०.२०१९ रोजीची असुन त्यावर रामचंद्र बबन करकंडे यांचे नाव असुन ती पावती रु.३,९०,०००/– बाबत असल्याचे नमुद आहे. सदर फिक्स्ड डिपॉझीट रिसीटला **ओळखीसाठी नि.१२७** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवलेले N13 मार्कींग असलेले सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे यांनी सविता संतोष दिघे यांचा चार्ज कमी करण्यासंदर्भात तलाठी, वडझीरे यांना पाठवण्यात आलेले पत्र दाखवण्यात आले. ते पत्र माझ्यासमक्ष पोलीसांनी रंगारी यांच्याकडुन जप्त केले होते. त्यास **ओळखीसाठी नि.१२८** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवलेले N14 मार्कींग असलेले साक्षी क्लीनीकल लॅबोरेटरीज यांनी कॅश क्रेडीट रिनीव्हलसाठी सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे यांना दिलेले पत्र दाखवण्यात आले. त्यावर आमच्या बँकच्या त्यावेळेसच्या मॅनेजरचा शेरा असुन त्यांची सही आहे. ते पत्र माझ्यासमक्ष पोलीसांनी रंगारी यांच्याकडुन जप्त केले होते. त्यास **ओळखीसाठी नि.१२९** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवलेले N15 मार्कींग असलेले सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे यांनी तलाठी, बाभुळवाडे यांना सुदाम चिमाजी मंडले यांच्या ७/१२ उता–यावरील बोजा कमी करण्यासंदर्भात दिलेले पत्र दाखवण्यात आले. ते पत्र माझ्यासमक्ष पोलीसांनी रंगारी यांच्याकडुन जप्त केले होते. त्यास

**ओळखीसाठी नि.१३०** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवलेले N16 मार्कींग असलेले सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे यांनी तलाठी, वडझीरे यांना आनंदा नामदेव बेलोटे यांच्या ७/१२ उता-यावरील बोजा कमी करण्यासंदर्भात दिलेले पत्र दाखवण्यात आले. त्यावर आमचे तत्कालीन शाखाधीकारी यांची सही आहे. ते पत्र माझ्यासमक्ष पोलीसांनी रंगारी यांच्याकडुन जप्त केले होते. त्यास **ओळखीसाठी नि.१३१** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवलेले N17 मार्कींग असलेले सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे यांनी कॅश क्रेडीट रिनीव्हलसाठी बाबाजी रामचंद्र हांडे यांना दि.७.६.२०२१ रोजी दिलेले पत्र दाखवण्यात आले. त्यावर आमचे तत्कालीन शाखाधीकारी यांची सही आहे. ते पत्र माझ्यासमक्ष पोलीसांनी रंगारी यांच्याकडुन जप्त केले होते. त्यास **ओळखीसाठी नि.१३२** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवलेले N18 मार्कींग असलेले सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे यांचे 3% interest subvention याचे १.४.२०१९ ते ३१.३.२०२० या कालावधीचा तक्ता दाखवण्यात आला. त्यावर आमचे तत्कालीन शाखाधीकारी यांची सही आहे. तो कागद पोलीसांनी माझ्यासमक्ष रंगारी यांच्याकडुन जप्त केले होते. त्यास **ओळखीसाठी नि.१३३** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवलेले N19 मार्कींग असलेले सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे यांचे विधीज्ञ रामचंद्र गवळी यांना शेत जमिनीवर चार्ज करण्यासाठी दि.४.११.२०१९ रोजीचे पत्र दाखवण्यात आले. त्यावर आमचे तत्कालीन शाखाधीकारी यांची सही आहे. ते पत्र पोलीसांनी माझ्यासमक्ष रंगारी यांच्याकडुन जप्त केले होते. त्यास **ओळखीसाठी नि.१३४** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवलेले N20 मार्कींग असलेले सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे यांचे नेटवर्थ सर्टीफिकेट दाखवण्यात आले. त्यावर आमचे तत्कालीन शाखाधीकारी यांची सही आहे. ते पोलीसांनी माझ्यासमक्ष रंगारी यांच्याकडुन जप्त केले होते. त्यास **ओळखीसाठी नि.१३५** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवलेले N21 मार्कींग असलेले सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे यांचे नेटवर्थ सर्टीफिकेट दाखवण्यात आले. त्यावर

आमचे तत्कालीन शाखाधीकारी व सहाय्यक शाखाधीकारी यांची सही आहे. ते पोलीसांनी माझ्या व दुसरे पंच यांच्या समक्ष रंगारी यांच्याकडुन जप्त केले होते. त्यास **ओळखीसाठी नि.१३६** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवलेले N22 मार्कींग असलेले सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे यांचे लघु मुदत पिक कर्ज मंजुरी करीता असलेला फॉर्म दाखवण्यात आला. त्यावर १५.११.२०१९ तारीख व रक्कम रु.३,९०,०००/- आणि राजेंद्र बाळु जगदाळे व संतोष कचर उबाळे यांचे नाव नमुद आहे. त्यावर आमचे तत्कालीन शाखाधीकारी यांची सही आहे. ते पोलीसांनी माझ्यासमक्ष रंगारी यांच्याकडुन जप्त केले होते. त्यास **ओळखीसाठी नि.१३७** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवलेले N25 मार्कींग असलेले सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे यांनी तलाठी, वडझीरे यांना खंडू विश्वनाथ झंझाड यांच्या ७/१२ उता-यावरील बोजा कमी करण्यासंदर्भात दिलेले पत्र दाखवण्यात आले. त्यावर आमचे तत्कालीन शाखाधीकारी व खंडु झंझाड यांची सही आहे. ते पत्र माझ्यासमक्ष पोलीसांनी रंगारी यांच्याकडुन जप्त केले होते. त्यास **ओळखीसाठी नि.१३८** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवलेले N26 मार्कींग असलेले सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे यांनी तलाठी, वडझीरे यांना प्रमिला हरीभाऊ दिघे यांच्या ७/१२ उता-यावरील बोजा कमी करण्यासंदर्भात दिलेले पत्र दाखवण्यात आले. त्यावर आमचे तत्कालीन शाखाधीकारी यांची सही व शिक्का आहे. ते पत्र माझ्यासमक्ष पोलीसांनी रंगारी यांच्याकडुन जप्त केले होते. त्यास **ओळखीसाठी नि.१३९** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवलेले N27 मार्कींग असलेले सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे यांनी तलाठी, वडझीरे यांना सिताराम भाऊ चौधरी यांच्या ७/१२ उता-यावरील बोजा कमी करण्यासंदर्भात दिलेले पत्र दाखवण्यात आले. त्यावर आमचे तत्कालीन शाखाधीकारी यांची सही व शिक्का आहे. ते पत्र माझ्यासमक्ष पोलीसांनी रंगारी यांच्याकडुन जप्त केले होते. त्यास **ओळखीसाठी नि.१४०** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवलेले N28 मार्कींग असलेले

दि.७.११.२०२० रोजीचे सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे यांचे रेसीडन्स टेलीव्हेरीफीकेशन रिपोर्ट दाखवण्यात आला. तो रिपोर्ट तृप्ती प्रमोद मोरे यांच्या संदर्भात असुन त्यावर आमचे तत्कालीन शाखाधीकारी यांची सही व शिक्का आहे. तो रिपोर्ट माझ्यासमक्ष पोलीसांनी रंगारी यांच्याकडुन जप्त केला होता. त्यास **ओळखीसाठी नि.१४१** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवलेले N12 व N29 मार्कींग असलेले दैनंदीन कार्यालयाचे सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे यांचे मस्टर दाखवण्यात आले. त्याचा कालावधी डिसेंबर २०१९ तेजानेवारी २०२० असा नमुद असुन त्यावर तत्कालीन स्टाफच्या सहया आहेत. ते मस्टर माझ्यासमक्ष पोलीसांनी रंगारी यांच्याकडुन जप्त केले होते. त्यास **ओळखीसाठी नि.१४२** देण्यात येते.

आता मला हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवलेले N30 मार्कींग असलेले दैनंदीन कार्यालयाचे सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे यांचे मस्टर दाखवण्यात आले. त्याचा कालावधी दि.५.१२.२०१९, ६.१२.२०१९, ७.१२.२०१९, २.१.२०२०, ३.१.२०२० आणि ४.१.२०२० असा नमुद असुन त्यावर तत्कालीन स्टाफच्या सहया आहेत. ते मस्टर माझ्यासमक्ष पोलीसांनी रंगारी यांच्याकडुन जप्त केले होते. त्यास **ओळखीसाठी नि.१४३** देण्यात येते.

वरील दाखवण्यात आलेले सर्व कागदपत्र पोलीसांनी माझ्यासमक्ष जप्त केले होते. हे म्हणणे खरे आहे की त्याचा पंचनामा सायंकाळी ४.१५ ते ५.०५ पर्यंत चालला होता. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांनी पंचनामा माझ्यासमक्ष टाईप करुन मला वाचुन दाखवुन माझी त्यावर सही घेतली. आता मला तो पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर अ.क्र.१ वर माझी सही असुन त्यास **नि.१४४** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला मदत होण्यासाठी मी सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा सांगितला होता.

**<u>उलटतपास आरोपीकरीता विधीज्ञ श्री.ए.पी. रोकडे यांच्यामार्फतः</u>**

हे म्हणणे खरे आहे की माझ्यासमक्ष  पोलीसांनी जी कागदपत्रे जप्त केली त्या कागदपत्रातील व्यवहार माझ्यासमक्ष झाला नाही व त्या कागदपत्रातील मजकुर माझ्यासमक्ष लिहीला गेला नाही.

प्रश्न– तुम्हाला सरकारी वकीलांनी दाखवलेले सर्व कागदपत्रांमधील मजकुर तुम्ही कोर्टासमोर वाचुन दाखवला?

उत्तर– सर्व कागदपत्रे माझ्यासमक्ष जप्त केलेली होती.

प्रश्न– दि.१.१२.२०२२ रोजीच्या पंचनाम्यासोबत अ.क्र.१ ते २१ वर दाखवण्यात आलेले कागदपत्रांमधील सही व तारखेबाबत मजकुर तुम्ही वाचुन सांगितला?

उत्तर– माझ्यासमक्ष कागदपत्र जप्त केलेली असल्याने मी आठवुन सांगितले.

मी मुळचा निघोज येथील रहीवासी आहे. पंचनाम्यावेळी मी वडझीरे शाखेत असीस्टंट ब्रांच मॅनेजर होतो. वडझीरे व निघोजमध्ये अंतर जवळजवळ आहे. ज्यावेळी अपहार झाला त्यावेळी मी अकोला जिल्हयातील उकळी बाजार येथील शाखेत कामास होतो. हे म्हणणे खरे आहे की मी सेंट्रल बँक ऑफ इंडीया,शाखा वडझीरे येथे असीस्टंट ब्रँच मॅनेजर असल्याने व निघोज येथील रहिवासी असल्याने ज्या खातेधारकांनी तक्रार केली होती त्यांच्याशी माझी ब–यापैकी ओळख होती. अपहारावेळी मला प्रकरणाबाबत माहीती नव्हते. मी वडझीरे शाखेत आल्यावर मला माहीती झाले. सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शाखा वडझीरे येथील कर्मचा–यांबाबत मोठे आंदोलन झाल्याचे मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की आनंद रविशंकर रंगारी हे आमच्या बँकेतील स्टॉफमध्ये असल्याने माझी त्यांच्याशी ओळख होती. हे म्हणणे खरे आहे की मी सेंट्रल बँक ऑफ इंडीया,शाखा वडझीरे ही माझ्या जवळची बँक असल्याने माझे पंचनाम्या अगोदर त्या बँकेत येणे जाणे असायचे.

प्रश्न– विद्या उघडे, बोरुडे यांच्याशी तुमची तोंडओळख होती?

उत्तर– मी नाव ऐकले होते, मी त्यांना प्रत्यक्ष भेटलो नाही.

प्रश्न– तुम्ही तज्ञ असल्याने तुमची पंचनाम्यासाठी पंच म्हणुन निवड केली होती?

उत्तर– तो आमच्या बँकेच्या मॅनेजमेंटचा निर्णय होता.

बँकेने मला पंच म्हणुन जाण्यास तोंडी सांगितले होते. मला पंच म्हणुन जाण्यास रिजनल ऑफीस, नागापुर एमआयडीसी, अहमदनगर वरुन सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की पंचनामा कशाच्या संदर्भात आहे याबाबत मला फोनवरुन माहीती दिली होती. पंचनाम्यासाठी जाण्याबाबत हालचाल रजिस्टरमध्ये मी नोंद केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की पंचनाम्यासाठी कुठे यायचे याबाबत मला आनंद रंगारी यांनी फोनवरुन सांगितले होते. मी सांगतो की मला ऑफीसवरुन

पारनेर पोलीस स्टेशनला पंचनाम्यासाठी येण्यासाठी सांगितले होते.

प्रश्न– तुम्हाला ऑफीसवरुन पंचनाम्यासाठी काही चेक, कोरे ड्राफटस् व व्हाऊचर जप्त करणार असल्याबाबत माहीती सांगितलेली होती?

उत्तर– मला केवळ पंचनाम्यासाठी जाण्याबाबत सांगितले होते व बाकी मला पंचनाम्याच्या ठिकाणी गेल्यावर कळाले.

हे मला माहीत नाही की मी पोलीस स्टेशनला पंचनाम्यासाठी येण्याअगोदर आनंद रंगारी यांनी जप्त केलेली कागदपत्रे अगोदरच आणुन ठेवलेली होती. मी दि.१.१२.२०२२ रोजीच्या पंचनाम्यासाठी बँकेतुन दुपारी ३.३० वाजता निघालो होतो. मी या अगोदर अशा पंचनाम्यास गेलो नव्हतो. तपासी अधिकारी यांच्याशी माझे पंचनाम्या अगोदर काही बोलणे झाले नव्हते. जप्त केलेले मस्टर आरोपीने पोलीसांसमोर माझ्यासमक्ष आणले असे काही घडले नाही. आरोपीने माझ्यासमक्ष पोलीसांसमोर जप्त केलेल्या मस्टरवर त्याची सही आहे असे काही सांगितले नाही. पंचनाम्यावेळी आरोपीस जेव्हा बाहेर आणले होते तेव्हा मी आरोपीस पाहीले होते.

प्रश्न– तुमच्यासमक्ष जप्त केलेल्या कागदपत्रांची शोधाशोध पंचनाम्यावेळी झाली का?

उत्तर– आमच्यासमोर अगोदरच कागदपत्रे ठेवलेली होती.

जप्त केलेल्या कागदपत्रांबाबत माझ्यासमोर सिल लावले होते.

प्रश्न– जप्त केलेले कागदपत्रे स्टेपल केले होते की शिक्का मारुन सिल केले होते?

उत्तर– हे मला आठवत नाही मात्र ते सिल केलेले होते.

सिल केलेल्या कागदपत्रांवरती माझ्यासमोर सही झाली होती. जप्त केलेल्या कागदपत्रांवरती माझी व दुसरे पंच, रंगारी साहेबांची व तपासी अधिकारी वाघ यांनी सहया केल्या होत्या. पंचनामा पोलीसांनी लिहीला.

प्रश्न– पंचनामा तपासी अधिकारी वाघ यांनी टाईप करुन तुमच्याकडे वाचण्यासाठी दिला?

उत्तर– आमच्यासमक्ष पंचनामा त्यांनी टाईप करुन आम्हाला वाचण्यासाठी दिला.

हे म्हणणे खरे आहे की पंचनामा झाल्यावर पोलीसांनी जप्त केलेली कागदपत्रे त्यांच्या ताब्यात ठेवली होती. पोलीसांनी मला जप्त केलेली कागदपत्रे मुद्देमाल विभागाला द्यावी लागेल व त्यावेळी तिथेही मला यावे लागेल असे त्यांनी मला

सांगितल्याचे आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांनी मला व समित बोराडे यांना पंचनाम्यासाठी बोलावल्यावर त्यांनी आम्हाला आधी बसवुन पंचनामा कसा करायचा याबाबत आमच्याशी चर्चा केली. हे म्हणणे खरे आहे की पंचनाम्याला आम्ही दोघे पंच येण्या अगोदर रंगारी पोलीस स्टेशनला अगोदरच हजर होते. हे म्हणणे खरे आहे की जप्त केलेली कागदपत्रे रंगारी यांनी पंचनामा करण्याअगोदर एक दोन दिवसांपुर्वीच काढुन ठेवली होती. पंचनामा करण्याच्या दोन दिवसांपुर्वी तपासी अधिकारी आमच्या शाखेत येवुन गेल्याचे मला आठवत नाही. पंचनामा होण्याअगोदर हेड ऑफीसची लोक आमच्या शाखेत एक दोन दिवसांपुर्वी आल्याचे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी आम्हाला जसे सांगितले त्याप्रमाणे आम्ही पंचनाम्यावर सहया केल्या. हे म्हणणे खरे आहे की जप्त केलेल्या कागदपत्रांवरती नोंदी ख–या आहेत की खोटया याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला गुंतवण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की पंचनामा झाल्यावर मी सही करायला तयार नसतांनाही पोलीसांनी मला बळजबरी करुन पंचनाम्यावर सही करायला सांगितले. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

NILESH SHRIPAL SABNIS
Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2025.08.25 17:58:04 +0530

(एन.एस.सबनीस)

दिनांकः २५/०८/२०२५.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२,

पारनेर.